# मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग
जा.क्र.मनपा/घ.व्य/७६५/२०२६-२७
दिनांक :- २८/०५/२०२६

प्रति,
सिस्टीम मॅनेजर
नागरी सुविधा केंद्र
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- कार्यादेश करारनामा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, घनकचरा व्यवस्थापन विभागात विविध कामाचे करारनामा करुन कार्यादेश देण्यात येतात.

तरी, कंत्राटदारास/ठेकेदारास देण्यात आलेले कार्यादेश, करारनामा व ठराव महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

(सोबत :- मुळनक्ती).

Gunijan

(योगेश गुणिजन)
सहा. आयुक्त (घ.व्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग
ईमेल - swmhealth@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/घ.व्य./37 /2026-27
दि. 16 /4 /2026

## // कार्यादेश //

प्रति,
**मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी**
5/सी, बॉम्बे मार्केट,
स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम.

**विषय :- पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामी यंत्र सामुग्री, वाहने व कंत्राटी मजुर पुरवठा करणेबाबत.**
संदर्भ :- 1. दि. 13/02/2025 रोजीची निविदा.
2. दि. 28/03/2025 रोजीची मा. आयुक्त यांची मंजुरी. E - 1038208
3. मा. प्रशासकीय ठराव क्र. 06, दि. 02/04/2025 रोजीची मंजुरी.
4. दि. 15/04/2025 रोजीचा करारनामा.
5. दि. 17/04/2025 रोजीचा कार्यादेश.
6. दि. 24/02/2026 रोजीची मा. आयुक्त यांची मंजुरी. E - 1038208
7. मा. महासभा ठराव क्र.32 दि.27/03/2026 रोजीची मंजुरी.
8. इकडील दि.15/04/2026 रोजीचे मुद्रांक शुल्क व बँक गॅरंटी जमा करणेबाबतचे पत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई/ खोदाई कामी यंत्र सामुग्री, डंपर, टोरस व मजुर पुरवठा करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. 06, दि.02/04/2025 अन्वये मंजुरी दिली आहे. त्यानुसार उक्त संदर्भ क्र. 04 व 05 अन्वये करारनामा करून कार्यादेश देण्यात आला आहे. सन 2026 -27 या वर्षातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई/ खोदाई कामी यंत्र सामुग्री, डंपर, टोरस व मजुर पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र.32 दि. 27/03/2026 अन्वये उक्त संदर्भ क्र. 5 कार्यादेशास नविन निविदा अंतिम होईपर्यंत मंजुरदरास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याकरीता आपणांमार्फत संदर्भ क्र. 8 नुसार Initial Performance Security Deposit म्हणून 3% रु. 9,91,580/- बेसीन कॅथलिक को. ऑ. बँक गॅरंटी क्र.012GTOB261060001, दि.16/04/2026 कालबाह्यता/ अंतिम दि.15/04/2027 जमा करण्यात आली आहे.

तरी, मनपा. क्षेत्रातील पावसाळयापुर्वी नाले सफाई कामी सदंर्भ क्र. 05 मधील मंजुर केलेले दर व करारानामा अटीशर्तीनुसार यंत्र सामुग्री, वाहने व हंगामी कंत्राटी मजुरांचा पुरवठा संबंधित स्वच्छता निरिक्षक यांच्या मागणीनुसार व नियंत्रणाखाली पूर्ण करण्यात यावा.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

प्रत माहितीस्तव :-
1. शहर अभियंता
2. सहा. आयुक्त (घ.व्य.)

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

### सन 2026-27

# // करारनामा //

**कंत्राटदाराचे नाव** :- **मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी**
5/सी, बॉम्बे मार्केट,
स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम.

**कामाचे नाव** :- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफाई /खोदाई करणे कामी भाड्याने यंत्र सामुग्री व हंगामी कंत्राटी मजुर पुरवठा करणे.**

**कामाची मंजुरी** :- 1. मा. महासभा ठराव क्र.32 दि.27/03/2026
2. दि. 02/04/2025 रोजी, प्रशासकिय ठराव क्र. 06.

निविदा अंदाजित रक्कम :- रु. 4.00 कोटी.

Scanned with OKEN Scanner

# CHALLAN
## MTR Form Number-6

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION Secretary Dept. Head Office Bhaindar (W)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| GRN | MH000803503202627E | BARCODE | | Date 15/04/2026-12:49:26 | Form ID |

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| Type of Payment | Non-Judicial Stamps-Consolidated Stamp Duty<br>Superintendent of Stamps | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | |
| Office Name | THD_JT DIST REGISTRAR THANE RURAL | Full Name | ASHAPURA CONSTRUCTION COMPANY |
| Location | THANE | | |
| Year | 2026-2027 One Time | Flat/Block No. | C 5 BOMBAY MARKET BLDG |
| | | Premises/Building | |
| | | Road/Street | STATION ROAD |
| | | Area/Locality | BHAYANDER WEST |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 0 1 1 0 1 |

| Account Head Details | Amount In Rs. |
|---|---|
| 0030045501 Consolidated Stamp Duty85 | 135000.00 |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| Total | 1,35,000.00 |

Remarks (If Any)

FRANKING FOR AGREEMENT

| | |
|---|---|
| Amount In Words | One Lakh Thirty Five Thousand Rupees Only |

| | |
|---|---|
| Payment Details | BANK OF BARODA |
| **Cheque-DD Details** | |
| Cheque/DD No. | |
| Name of Bank | |
| Name of Branch | |

**FOR USE IN RECEIVING BANK**

| | | | |
|---|---|---|---|
| Bank CIN | Ref. No. | 02003942026041500501 | 1487282978 |
| Bank Date | RBI Date | 15/04/2026-12:50:32 | Not Verified with RBI |
| Bank-Branch | | BANK OF BARODA | |
| Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :
Mobile No. : XXXXXX3129

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

M/S. ASHAPURA CONST...
Proprietor

Scanned with OKEN Scanner

# // करारनामा //

**करारनामा लिहुन देणार** :- **मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी**
5/सी, बॉम्बे मार्केट,
स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम.

**करारनामा लिहुन घेणार** :- **उप-आयुक्त (घ.व्य.)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

कारणे करारनामा लिहून देण्यात येतो की...............

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन 300, पोकलन 200, बोटसह पोकलन मशिन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा कामाकरीता करारनामा लिहून देणार यांचे दर दि. 02/04/2025 रोजी, प्रशासकिय ठराव क्र. 06 अन्वये मंजुर करण्यात आले आहे. तसेच सन 2026 -27 या वर्षातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई/ खोदाई कामी यंत्र सामुग्री, डंपर, टोरस व मजुर पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र.32 दि.27/03/2026 अन्वये मुदतवाढ करीता मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार काम पुर्ण करून देण्याची जबाबदारी करारनामा लिहून देणार याची राहील.

**-: अनुसुची :-**

| अ.क्र. | तपशिल | मंजुर दर (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| 1. | POCLAIN MACHINE - 300 | RS. 7900/- PER HOUR |
| 2. | POCLAIN MACHINE - 200 | RS. 2,225/- PER HOUR |
| 3. | POCLAIN MACHINE WITH BOAT | RS. 2,490/- PER HOUR |
| 4. | JCB MACHINE | RS. 1,225/- PER HOUR |
| 5. | TORAS | RS. 10,100/- PER SHIFT |
| 6. | DUMPER | RS. 7,150/- PER SHIFT |
| 7. | HAYDRA MACHINE | RS. 1,040/- PER HOUR |
| 8. | MAN POWER | RS.1,241/- PER LABOUR / PER DAY (08 HOUR) |

**अटीशर्ती :-**

1. Initial Performance Security Deposit म्हणून 3% रु. 9,91,580/- बेसीन कॅथलिक को. ऑ. बँक गॅरंटी क्र.012GTOB261060001, दि.16/04/2026 कालबाह्यता/ अंतिम दि.15/04/2027 जमा करण्यात आली आहे.
2. निविदाकाराने महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार वाहने, यंत्र सामुग्री व कंत्राटी हंगामी मजुर पुरवठा करणे बंधनकारक आहे.
3. नाले सफाई कामाच्या देयकातून 2% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल.
4. नाले सफाई कामातून निघालेला गाळ/ माती/ कचरा इत्यादी टाकाऊ पदार्थ विल्हेवाट लावणेची जबाबदारी निविदाकाराची राहील. स्वत: जागा उपलब्ध करून गाळ/ माती विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.
5. वर्कमेम कॉम्पेन्सेशन ऍक्ट 1923 नुसार एजन्सीला कंत्राटी हंगामी मजुर भरपाई पॉलिसीची प्रत सादर करणे बंधनकारक राहील. (WAGES AS PER MINIMUM WAGES ACT 1948)
6. निविदाकाराने EPF excluded कामगारांचा EPF फॉर्म 11 भरून ठेवला पाहिजे आणि त्याची प्रमाणित प्रत MBMC कार्यालयात मजुराच्या नोंदणीसह सादर केली पाहिजे. कामगार EPF कायदा 1952 अंतर्गत समाविष्ट असल्यास, एजन्सीने कामगारांच्या पगारातून EPf कपात करणे आवश्यक आहे आणि EPF कायदा 1952

Scanned with OKEN Scanner

... EPF ... आवश्यक आहे. तसेच निविदाकाराने कामगारांना ESIC लागु नसल्यास विमा काढणे बंधनकारक राहील.

7. नाले सफाईचे नियोजन आरोग्य निरिक्षक यांचेशी चर्चा करून दर आठवड्याचे नियोजन उपायुक्त (घ.व्य.) यांना सादर करणे बंधनकारक आहे.

8. नाले सफाई करताना निविदाकारांच्या यंत्र सामुग्रीमार्फत खाजगी किंवा मनपा. बांधकाम तुटल्यास अथवा तोडावे लागल्यास, त्या बांधकामाचा सर्व खर्च निविदाकारास करणे बंधनकारक आहे.

9. नाले सफाईची कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी काही वेळा यंत्र सामुग्रीद्वारे आवश्यकतेनुसार जादा तास काम करणे बंधनकारक आहे.

10. जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर प्रत्येक वेळी नाल्यापर्यंत वाहतुक करणे तसेच सुरक्षा विषयक साहित्य व नाले सफाईच्या कामाकरीता लागणारे साहित्य वस्तुचा पुरवठा स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

11. नाले सफाईचे काम चालु असताना कोणत्याही परिस्थितीत चार तासा पेक्षा जास्त काळ यंत्र सामुग्री बंद राहणार नाही याची खबरदारी निविदाकाराने घ्यावयाची आहे. तसे झाल्यास तातडीने पर्यायी व्यवस्था करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

12. निविदाकाराने दररोज केलेल्या कामाबाबत संबंधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाची अहवाल व चलनावर स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. याकामी आवश्यक लागणारी चलन बुक, अहवाल बुक इत्यादी स्टेशनरी स्वखर्चाने छपाई करावी, आणि ती उपायुक्त यांचेकडून प्रमाणित करून घ्यावी.

13. कार्यादेशात नमुद केलेल्या यंत्र सामुग्रीच्या संख्येत आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. जादा यंत्र सामुग्री व साहित्य, कंत्राटी हंगामी मजुरांची आवश्यकता लागल्यास त्याच मंजुर दरात पुरवठा करणे बंधनकारक राहील.

14. महानगरपालिकेच्या स्वच्छता निरिक्षकांच्या सुचनेनुसार जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर पुरवठा न केल्यास खालीलप्रमाणे प्रती दिन विलंब दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | दंड रक्कम |
|---|---|---|
| 1. | POCLAIN MACHINE - 300 | Rs. 3000/- PER Day |
| 2. | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2000/- PER Day |
| 3. | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 1000/- PER Day |
| 4. | JCB MACHINE | Rs. 500/- PER Day |
| 5. | TORAS | Rs. 500/- PER Day |
| 6. | DUMPER | Rs. 500/- PER Day |
| 7. | HAYDRA MACHINE | Rs. 1000/- PER Day |
| 8. | MAN POWER | Rs. 500/- PER Day |

15. नाले सफाईची कामे करताना जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुरांमार्फत कोणत्याही प्रकारचा अपघात किंवा जिवीत वा वित्तहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाकारांवर राहील.

16. निविदाकाराने काम समाधानकारक न केल्यास किंवा काम मध्येच सोडल्यास इसारा रक्कम जमा करण्यात येईल. तसेच कार्यादेश व कारारनामा रद्द करण्यात येईल व व्दित्तीय लघुतम दराच्या निविदाकारास कंत्राट दिल्यास येणाऱ्या मुळ फरकाची रक्कम प्रथम निविदाकाराकडून वसुल करण्यात येईल.

17. निविदाकाराने नाले सफाईचे संबंधित सर्व कामांचे सुरु होण्यापूर्वी, काम सुरु असताना व काम पुर्ण झाल्यानंतर यापध्दतीने झालेल्या कामाचे दररोज GeoTag केलेले फोटो व छायाचित्रीकरण करून फोटो व छायाचित्रीकरण देयका सोबत जोडून घनकचरा व्यवस्थापन विभागास सादर करणे बंधनकारक आहे.

18. जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर नाले सफाईसाठी असून पावसाळ्या दरम्यान अतिवृष्टीत पुर परिस्थिती झाल्यास, आणीबाणीच्या परिस्थितीत महानगरपालिकेस

M/S. ASHAPURA CONSTRUCTION CO.
Proprietor

उपायुक्त (घ.व्य.)

Scanned with OKEN Scanner

जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन, टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुर त्याच मंजुर दरात पुरवायचे आहेत, तसे न केल्यास महानगरपालिका इतर पुरवठादाराकडून यंत्र सामुग्री, साहित्य मजुर घेऊन सदरचे काम पूर्ण करील, याकामी येणारा खर्च संबंधित निविदाकारांच्या देयकातून वसुल करण्यात येईल.

19. नाले सफाई करणाऱ्या कंत्राटी हंगामी मजुरांचे नाव हजेरीपत्रकारवर नोंदवून मस्टर अद्यावत ठेवणे बंधनकारक आहे.

20. नाले सफाई करणाऱ्या कंत्राटी हंगामी मजुरांचे वेतन अदा केल्याचे रजिस्टर कंत्राटदाराने ठेवणे बंधनकारक आहे.

21. मजुरांमार्फत नाले सफाई करताना आवश्यक असलेले साहित्य, सुरक्षा उपकरणे (Handgloves, Gumboot, Mask) संबंधीत स्वच्छता निरिक्षकाकडे पुरवठा करण्यात आलेल्या कंत्राटी हंगामी मजुरांच्या संख्येनुसार काम सुरु होण्यापूर्वी जमा करणे बंधनकारक आहे.

22. नाले सफाईचे काम करतेवेळी कामगारांना इजा झाल्यास प्रथमोउपचार व वैद्यकीय व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

23. निविदाकाराने आवश्यकतेनुसार स्वतंत्र पर्यवेक्षकाची नेमणुक करून त्याची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक संबंधित स्वच्छता निरिक्षक, प्रभाग अधिकारी तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागास कळविणे बंधनकारक आहे.

24. नाले सफाईची कामे करताना कांदळवनाच्या झाडाची हानी, पर्यावरण विषयक नियमातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

25. नाले सफाई कामावर प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरिक्षक तसेच मा. आयुक्त यांनी नेमणुक केलेले सर्व अधिकारी यांचेमार्फत देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येईल.

26. नाले सफाईचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीत स्वच्छता निरिक्षक/ संबंधित कनिष्ठ अभियंता यांना केलेले काम समक्ष दाखवून प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

27. नाले सफाई कामी काढलेला गाळ वाहतुकी करीता वापरात येणाऱ्या वाहन क्रमांक व वाहनांचे कागदपत्रे झेरॉक्स संबंधीत स्वच्छता निरिक्षक व घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचेकडे देणे बंधनकारक आहे.

28. नाले सफाई कामातून निघालेला गाळ रितसर विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

29. सर्व वाहने आर.टी.ओ. फिटनेस प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच चालकाचा वाहन चालवण्याचा परवाना, वाहनांचे इंश्योरन्स इत्यादी बाबी वेळोवेळी सादर करणे बंधनकारक आहे.

30. नैसर्गिक आपत्ती उदा. आग, पुर, वादळ, वीज पडणे, भुकंप, ज्वालामुखी तसेच अपघात यामुळे व संप, संचारबंदी, टाळेबंदी यामुळे होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महानगरपालिका जबाबदार असणार नाही, कुठलीही भरपाई मिळणार नाही.

31. बाल मजुर कायदा, पर्यावरण कायदा 1986 नियमांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक आहे. याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

32. मजुरांना कामगार किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे निविदाकारांवर बंधनकारक राहील.

33. निविदाकाराने 18 पेक्षा जास्त व 58 पेक्षा कमी वयाच्या कामगारांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

34. निविदाकाराने सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

35. कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यास मा. न्यायालय ठाणे क्षेत्र न्यायालय राहील.

36. निविदेसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद ठाणे मा. न्यायालयात सोडविण्यात येईल व सदरचा निर्णय दोन्ही पक्षकारास बंधनकारक राहील.

37. निविदाकारावर प्रचलित शासकीय नियम पाळणे व बाल कायदा अंतर्गत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

38. सर्व शासकीय विविध कर भरण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील.

39. निविदाकाराने मंजुर दरात नाले सफाई कामा व्यतिरिक्त इतर कामाकरीता आवश्यकतेनुसार कंत्राटी हंगामी मजुर, डंपर, टोरस, जे.सी.बी. व इतर यंत्रसामुग्रीचा पुरवठा घनकचरा व्यवस्थापन विभाग तथा मनपाच्या अन्य विभागास पुरवठा करणे बंधनकारक राहील.

M/S. ASHAPURA CONSTRUCTION CO.

Proprietor

उपायुक्त (घ.व्य.)

महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

40. निविदाकारा समवेत महानगरपालिकेने केलेल्या करारनामा/ कार्यादेशाची मुदत एक वर्षाची राहील. सदरचे दर एका वर्षाकरीता असतील. आपत्ती व्यवस्थापनासाठी मंजुर दरात वर्षभर कामे करणे बंधनकारक असेल.

41. कंत्राट कालावधीत कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे निविदाकरावर बंधनकारक राहील.

42. निविदाकाराने निविदेसोबत जोडलेले कागदपत्रे, निविदा व इतर कागदपत्रे सदर करारनामाचे भाग समझ्याण्यात यावे. व सदर कागदपत्रातील अटीशर्ती दोन्ही पक्षकारास बंधनकारक राहील.

सदरील मंजुर केलेले काम हे निविदा सुचना, निविदा फॉर्म मधील सर्व अटीशर्ती, कलमे आम्हास मान्य असुन त्यानुसार सदर काम पुर्ण करून देण्याची जबाबदारी आमची राहील. सदर करारनामा लिहुन देण्यात येत आहे. सदर करारनामा आज दि.16/4/2026 रोजी चांगल्या मन:स्थितीत लिहुन दिला असे.

(निविदा अंदाजपत्रकीय रु. 5.00 कोटी)

**करारनामा लिहुन देणार**
M/S. ASHAPURA CONSTRUCTION CO.
Proprietor

**करारनामा लिहुन घेणार**
**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**साक्षीदार :-**

अनिल दत्तराम मांजरेकर

U Bhavsar
वंदना संजय भावसार

सन 2026 /2027 करारनामा नोंदवही
अनुं. क्र.23 दि. २९/ ०४ /२६ अन्वये
नोंद करणेत आली -(एकुण) पाने ९ते
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner